स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

कला विद्याशाखांतर्गत मराठी विषयातील पीएच्.डी. पदवीसाठी सादर
केल्या जाणाऱ्या संशोधनाची रूपरेषा

संशोधन विषय

“श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास”

संशोधक

संजीवकुमार श्रीमंतराव माने

एम.ए., एम.एड्., नेट

मार्गदर्शक

डॉ.नरसिंग अप्पासाहेब कदम

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,

श्री शिवाजी महाविद्यालय उदगीर जि.लातूर

अभ्यासकेंद्र

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

2023

“श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास”

<u>अनुक्रमणिका</u>

- प्रस्तावना
- विषय निवडीमागील भूमिका
- उद्दिष्ट्ये
- अभ्यास पद्धती
- संशोधन विषयाचे महत्त्व
- संशोधनाची गृहितके
- संशोधन क्षेत्र मर्यादा
- तथ्य संकलनाचे स्त्रोत
- प्रकरणांची रूपरेषा
- प्रकरण 1 ले-श्रीराम गुंदेकर : लौकिक आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप
- प्रकरण 2 रे-श्रीराम गुंदेकर यांचे कथालेखन : स्वरूप व वैशिष्ट्ये
- प्रकरण 3 रे-श्रीराम गुंदेकर यांच्या समीक्षालेखनाचा चिकित्सक अभ्यास
- प्रकरण 4 थे-श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकीय साहित्याचे इतिहासलेखन-एक चिकित्सक अभ्यास
- प्रकरण 5 वे - श्रीराम गुंदेकर यांच्या स्फूट लेखनाचा चिकित्सक अभ्यास
- प्रकरण 6 वे - श्रीराम गुंदेकर यांच्या एकूण साहित्याचे मूल्यमापन आणि स्थान निश्चिती
- प्रकरण 7 वे - निष्कर्ष व समारोप
- संदर्भ ग्रंथ सूची
- परिशिष्ट्ये

प्रस्तावना :

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन विषय म्हणून मी "श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास" निवडलेला आहे. एका लेखकाचा अभ्यास करीत असताना कोणकोणत्या बाबी महत्त्वाच्या आहेत, लेखकाचे जीवन आणि त्याचे साहित्य, लेखकाचे व्यक्तिमत्व आणि साहित्य यांचा जवळचा संबंध असतो. कारण जीवनाच्या वाटचालीत येणाऱ्या विविध अनुभवातून लेखकाचे व्यक्तिमत्व तो स्वत: साकारत असतो. त्याच्या उमलत्या वयात तो ज्या व्यक्तीच्या सहवासात येतो त्याचा प्रभाव कळत-नकळत त्या लेखकावर होताना दिसून येतो. कुटुंबातील आई, वडील, भाऊ, बहीण, नातेवाईक, एखादा शिक्षक, एखादा प्रभावी लोकनेता यांचाही प्रभाव लेखकाच्या मन:पटलावर उमटत असतो. त्याची उपजत मनोवृत्ती आणि या सर्वांचा त्याच्यावर होणारा परिणाम यातून लेखकाचे व्यक्तिमत्व साकार होत असते.

एका लेखकाचा अभ्यास करताना देशकाल, परिस्थितीचाही विचार करावा लागतो. ही देश-काल परिस्थिती पहिली म्हणजे लेखकाची व्यक्ती म्हणून जडण घडण होण्याच्या काळाच्या संदर्भातील आणि दुसरी म्हणजे लेखक ज्या काळात लिहित असतो त्या काळातील. अशा दोन संदर्भात विचारात घ्यावा लागतो.

थोडक्यात एखाद्या लेखकाची साहित्यनिर्मिती आणि देशकाल परिस्थिती याचा जैविक संबंध कसा असतो, त्याच्या उमलत्या वयात तो ज्या व्यक्तीच्या सहवासात येतो त्यांचे संस्कार लेखकावर कसे होतात, लेखकाचे बालपण, त्याचे कौटुंबिक जीवन, त्याची साहित्यिक जडणघडण, साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा, त्याच्या वाङ्मयातील अनेक बाबींचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी मी "श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडलेला आहे.

विषय निवडीमागील भूमिका :

भारतीय लोकांना गोष्टी ऐकण्याचा खूप छंद असतो, नव्हे आहे. यातूनच विविध कथा प्रकार जन्मास आलेले आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या बी.ए. अभ्यासक्रमातील कथांचा अभ्यास करत असताना 'लगाम' ही कथा माझ्या वाचनात आली. आणि त्या कथासंग्रहातील 'श्रीराम गुंदेकर यांची कथा' ही नागनाथ कोत्तापल्ले यांची प्रस्तावना वाचल्यानंतर श्रीराम गुंदेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध पैलु म्हणजे श्रीराम गुंदेकर हे अध्यापनाचे कार्य करीत असले तरी त्यांनी आपल्या उमेदीची अनेक वर्षे सामान्य माणसाचे, श्रमिकांचे, शोषितांचे, दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी खूप मोठे योगदान दिलेले आहे. हे माझ्या लक्षात आले व त्यातूनच त्यांच्याविषयी अधिक माहिती गोळा करण्याची जिज्ञासा माझ्या मनामध्ये निर्माण झाली आणि नकळत त्यांच्या साहित्याकडे मी वळलो. " सर्वात महत्त्वाचे म्हणजे मराठीमध्ये कार्यकर्ता असणारा लेखक ही संकल्पना अजून फारशी रूजलेली नाही. आपल्याकडे लेखन करणारा लेखक आणि सामाजिक कार्य करणारा समाजसेवक अशी सरळसरळ विभागणी असते. मराठीतील बहुसंख्य लेखक समाज जीवनातील धकाधकीपासून दूरच राहतात."[1]

त्यामुळे मुळात कोणताही कौटुंबिक साहित्यिक वारसा न लाभलेल्या श्रीराम गुंदेकर यांनी साहित्य क्षेत्रात 'लगाम' आणि 'उचल' या दोन कथासंग्रहाच्या माध्यमातून कशी उत्तुंग भरारी घेतली. कविता, बालसाहित्य, समीक्षा, संपादीत ग्रंथ, सत्यशोधकी चळवळीचा इतिहास याचबरोबर नवसाक्षरांसाठी लेखन कसे केलेले आहे, त्यांच्या एकूण साहित्यात त्यांचे जीवनविश्व, जीवनविषयक तत्त्वज्ञान कसे साकारले आहे, कार्यकर्ता म्हणून असलेले त्याचे एकूण व्यक्तिमत्व साहित्यक्षेत्रात साहित्याच्या माध्यमातून खरोखरच जनजागृती करताना दिसून येते का? श्रीराम गुंदेकर हे सत्यशोधकी कार्यकर्ता म्हणून किती यशस्वी झाले आणि साहित्यिक म्हणून किती

प्रमाणात यशस्वी झाले? याचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून मी "श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडलेला आहे.

उद्दिष्ट्ये :

कोणतेही कार्य करण्यापूर्वी त्याचे उद्दिष्ट ठरविणे आवश्यक असते कारण त्यामुळे कार्याला एक प्रकारची दिशा मिळते. सदर संशोधन कार्य यशस्वी होण्यासाठी संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) श्रीराम गुंदेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करणे.

2) श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा समजून घेणे.

3) श्रीराम गुंदेकर यांची साहित्याबद्दलची भूमिका समजून घेणे.

4) श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकी चळवळीतील साहित्यिक योगदान आणि सत्यशोधकी विचाराचा त्यांच्या साहित्यावरील परिणाम अभ्यासणे.

5) श्रीराम गुंदेकर यांचे मराठी साहित्यातील स्थान समजून घेणे.

अभ्यास पद्धती :

श्रीराम गुंदेकर यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास करताना समीक्षेच्या विविध अभ्यास पद्धतीचे उपयोजन करावयाचे आहे. विशेषत: चरित्रात्मक, ऐतिहासिक, वर्णनात्मक, समाजशास्त्रीय, शैलीशास्त्रीय अभ्यासपद्धती व इतर विचार प्रणालीचा आधार घेऊन हा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

सदर संशोधनामुळे श्रीराम गुंदेकर यांच्या समग्र साहित्याचा परिचय तर होतोच त्याचबरोबर अभ्यासक आणि वाचक यांना श्रीराम गुंदेकर यांच्या एकूण साहित्याची रूपरेषा, स्वरूप वैशिष्ट्ये तसेच ग्रामीण कथाकार, संपादक, सत्यशोधक म्हणून त्यांच्या कार्याची, साहित्यातील गुणदोषांची, एकूणच एक सत्यशोधकी चळवळीतील कार्यकर्ता,

साहित्यक्षेत्रात खरोखरच उत्तुंग भरारी मारू शकतो का? त्यात तो कितपत यशस्वी होतो, हे समजून घेण्यास मदत होते.

गृहितके :

1) सत्यशोधकी कार्यकर्ता म्हणून श्रीराम गुंदेकर यांचा जेवढा नावलौकिक आहे तेवढा साहित्यिक म्हणून त्यांचा प्रभाव जाणवत नाही.

2) त्यांच्या एकूण साहित्यावर सत्यशोधकी विचारांचा वरचष्मा दिसून येतो.

संशोधन क्षेत्र मर्यादा :

संशोधन वस्तुनिष्ठ आणि वास्तवप्रत येण्यासाठी क्षेत्र मर्यादा निश्चित करणे आवश्यक असते. म्हणून श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास हा विषय निवडला आहे. यात श्रीराम गुंदेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, लिखित साहित्याचा आणि त्यातील वैचारिक भूमिकेचा अभ्यास करण्यात येणार आहे.

श्रीराम गुंदेकर लिखित समग्र वाङ्मय

अ) कथासंग्रह

1) लगाम

2) उचल

ब) बालकविता संग्रह

1) ढगाची तहान

क) समीक्षा ग्रंथ

1) महात्मा फुले : विचार आणि वाङ्मय

2) महात्मा फुले : साहित्य आणि साहित्यमूल्ये

3) सत्यशोधकीय साहित्य : परंपरा आणि स्वरूप

4) ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन

ड) संपादीत ग्रंथ

1) बळीबा पाटील
2) ढढ्ढाशास्त्री परान्ने
3) देशभक्त लीलासार
4) सत्यशोधकी निबंध

इ) सत्यशोधकी साहित्याचा इतिहास खंड 1,2,3

ई) नवसाक्षरांसाठी केलेले लेखन व इतर भाषणे

तथ्य संकलनाचे स्त्रोत :

अ) मूळ स्त्रोत :

1) मूळ कलाकृती
2) मूळ संदर्भग्रंथ

ब) दुय्यम स्त्रोत :

1) नियतकालिके, मासिके, अध्यक्षीय भाषणे, दिवाळी अंक, स्मरणिका, दैनिक वृत्तमानपत्रे इ.

<u>प्रकरण रुपरेषा</u>

"श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास" या प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने अभ्यास करीत असताना त्यात सुसूत्रता आणि सुयोग्यपणा यावा या दृष्टिकोनातून विषयाची रचना सात प्रकरणांमध्ये करण्यात आलेली आहे. ती पुढीलप्रमाणे

प्रकरण 1 ले - श्रीराम गुंदेकर : लौकिक आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप

प्रकरण 2 रे - श्रीराम गुंदेकर यांचे कथालेखन : स्वरूप व वैशिष्ट्ये

प्रकरण 3 रे - श्रीराम गुंदेकर यांचे समीक्षालेखनाचा चिकित्सक अभ्यास

प्रकरण 4 थे - श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकीय साहित्याचे इतिहासलेखन : एक चिकित्सक अभ्यास

प्रकरण 5 वे - श्रीराम गुंदेकर यांच्या स्फूट लेखनाचा अभ्यास

प्रकरण 6 वे - श्रीराम गुंदेकर यांच्या एकूण साहित्याचे मूल्यमापन आणि स्थान निश्चिती

प्रकरण 7 वे - निष्कर्ष व समारोप

" श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास "

प्रकरणांचा संक्षिप्त आराखडा

प्रकरण 1 ले

डॉ.श्रीराम गुंदेकर लौकिक आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचे स्वरूप

प्रत्येक मनुष्याच्या बाबतीत कलावंत म्हणून एक आणि व्यक्ती म्हणून एक असे दुहेरी जीवन लेखकाच्या वाट्याला येत असते. लेखकाच्या जडणघडणीत त्याच्या पूर्वपरंपरेचा, त्यांच्यावर झालेल्या विविध सामाजिक धार्मिक संस्काराचा मोठा वाटा असतो. त्या वातावरणाचा आणि परिस्थितीचा अनुकूल, प्रतिकूल प्रभाव श्रीराम गुंदेकर यांच्या व्यक्तिमत्त्वावर कसा पडला आणि त्यांनी आपल्या लेखनात तो कसा अभिव्यक्त केला. कारण "जो लेखक आपल्या वास्तव जीवनानुभवाशी प्रामाणिक राहून लेखन करतो. त्याचेच लेखन कलात्मक पातळी गाठण्यात यशस्वी होत असते."[2] त्यामुळेच श्रीराम गुंदेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष शोधून मराठी वाङ्मयातील भरीव योगदानाचा अभ्यास या प्रकरणातून करावयाचा आहे.

प्रकरण 2 रे

श्रीराम गुंदेकर यांचे कथालेखन : स्वरूप व वैशिष्ट्ये

श्रीराम गुंदेकर यांचे 'लगाम' आणि 'उचल' हे दोन कथासंग्रह प्रकाशित असून त्यांनी या कथासंग्रहातून मानवी नातेसंबंधाचा आणि अस्तित्त्वाचा घेतलेला वेध याचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांच्या कथालेखनाची वैशिष्ट्ये,स्वरूप आणि कथा या वाङ्मयप्रकारातील त्यांची स्थान निश्चिती या प्रकरणामध्ये करावयाची आहे.

प्रकरण 3 रे

श्रीराम गुंदेकरांचे समीक्षालेखनाचा चिकित्सक अभ्यास

या प्रकरणात प्रामुख्याने श्रीराम गुंदेकर लिखित खालील चार समीक्षा ग्रंथाचा आणि त्याचबरोबर त्यांनी संपादन केलेल्या पुस्तकातील प्रस्तावनांचा चिकित्सक अभ्यास करावयाचा आहे.

<u>समीक्षा ग्रंथ</u>

1) म.ज्योतीबा फुले : विचार आणि वाङ्मय

2) म.ज्योतीबा फुले : साहित्य आणि साहित्यमूल्ये

3) सत्यशोधकी साहित्य : परंपरा आणि स्वरूप

4) ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन

<u>संपादीत ग्रंथ</u>

1) बळीबा पाटील

2) ढ्ढाशास्त्री परान्ने

3) देशभक्त लीलासार

4) सत्यशोधकी निबंध

प्रकरण 4 थे

श्रीराम गुंदेकर यांचे सत्यशोधकीय इतिहास लेखन : एक आकलन

म.फुले यांचा संदेश मनावर बिंबवून अविरत साहित्यक्षेत्रात आणि सत्यशोधकी चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या श्रीराम गुंदेकर यांनी सत्यशोधकी साहित्याचा इतिहास लिहिण्याचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतलेला आहे. त्याचा एक खंड प्रकाशित झाला असून दुसरा खंड प्रकाशनाच्या मार्गावर आहे आणि तिसऱ्या खंडाचे लेखनकार्य पूर्ण होत आलेले आहे. या इतिहास लेखनाचा सविस्तर अभ्यास या प्रकरणामध्ये करावयाचा आहे.

प्रकरण 5 वे

श्रीराम गुंदेकर यांच्या स्फूटलेखनाचा चिकित्सक अभ्यास

श्रीराम गुंदेकर यांचा ‘ ढगाची तहान ’ हा एकमेव बालकविता संग्रह प्रकाशित आहे. या कवितासंग्रहाची स्वरूप वैशिष्ट्ये तसेच नवसाक्षरांसाठी केलेले लेखन, महात्मा फुले यांचे चरित्रलेखन, त्याची स्वरूप वैशिष्ट्ये आणि त्यांची काही भाषणे व इतर स्फुट लेखन इत्यादींचा सविस्तर अभ्यास करून साधक-बाधक चर्चा या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण 6 वे

श्रीराम गुंदेकर यांच्या साहित्याचे मूल्यमापन (स्थान निश्चिती)

प्रस्तुत प्रकरणात अभ्यास विषय झालेले श्रीराम गुंदेकर कोणत्या श्रेणीचे आहेत हे लक्षात येण्यासाठी त्यांचा समकालीन व उत्तरकालीन लेखकांवर काही प्रभाव पडलेला आहे का? याचा या प्रकरणात शोध घ्यावयाचा आहे. तसेच सत्यशोधकी कार्यकर्ता आणि कथालेखक, समीक्षक, संपादक, इतिहासकार म्हणून मराठी साहित्यक्षेत्रातील त्यांचे योगदान, यश-अपयश, मुलाखत आणि समग्र साहित्याच्या अभ्यासाआधारे श्रीराम गुंदेकर यांचे मराठी साहित्यातील स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रकरण 7 वे

निष्कर्ष

वरील सर्व प्रकरणाच्या बृहद आराखड्यानुसार सदर विषयासंबंधी सखोल अभ्यास करून संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष मांडणे आणि त्यांची मराठी ग्रामीण कथाक्षेत्रातील, समीक्षासृष्टीतील आणि एकूणच साहित्य क्षेत्रातील स्थान निश्चिती करून त्यांची सांगोपांग चर्चा या शेवटच्या प्रकरणात करण्यात येईल.

संदर्भ सूची

1) आधारभूत ग्रंथ सूची

2) संदर्भ ग्रंथ सूची

परिशिष्ट्ये

1) श्रीराम गुंदेकर यांचा अल्प परिचय

2) श्रीराम गुंदेकरांची साहित्यसंपदा

3) श्रीराम गुंदेकर यांना मिळालेले पुरस्कार

4) श्रीराम गुंदेकरांची मुलाखत

5) संदर्भ ग्रंथ सूची

संदर्भ ग्रंथ सूची :

1) ' लगाम ' ची प्रस्तावना (डॉ.नागनाथ कोत्तापल्ले) - डॉ.श्रीराम गुंदेकर

2) एका लेखकाचा अभ्यास, बाळकृष्ण कवठेकर

* शोध निबंधाची लेखन पद्धती - स.ग.मालशे

* भाषा व साहित्य संशोधन खंड 1 ला, संपा.डॉ.वसंत जोशी

* शैक्षणिक संशोधन पद्धती - बी.एम. कऱ्हाडे

संशोधक विद्यार्थी
संजीवकुमार श्रीमंतराव माने

मार्गदर्शक
डॉ.नरसिंग अप्पासाहेब कदम
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग,
शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर